**जगभर**

# पनामा पेपर्स : हिमनगाचे टोक

## चन्द्रशेखर पुरन्दरे

जगातील अनेक देशात भ्रष्ट राजवटी आहेत हे सर्वश्रुत आहे. त्यांचे रंग निराळे असतील - लोकशाही, हुकूमशाही, साम्यवादी, वगैरे. पण भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांचा ते ज्या राष्ट्राचे प्रमुख असतात त्या राष्ट्रावर विश्वास नसतो हा पहिला मुद्दा. दुसरा म्हणजे सत्तेचा गैरवापर करून राष्ट्राच्या मालकीचा अवाढव्य पैसा हे राज्यकर्ते वैयक्तिक मालमत्ता म्हणून गोळा करतात. उदा. देशातील खनिजे, तेल इत्यादी नैसर्गिक माल छुपेपणे निर्यात करणे व त्याची किंमत स्वत:च्या खिशात टाकणे; देशासाठी आयात होणारी शस्त्रात्रे, विमाने यांचा पुरवठा करणाऱ्या आंतर-राष्ट्रीय कंपन्यांकडून लाच मिळवणे,सरकारी कंत्राटातून लाच खाणे, इत्यादी. हा पैसा वैध नसल्याने देशातील बँकेत स्वत:च्या नावाने ठेवता येत नाही- पैसा कोठून आला हे जाहीर करावे लागेल, त्यावर कर भरावा लागेल, अशा अनेक 'अडचणी' असतात. या गुन्हेगारीखेरीज प्रचंड वैध पैसा मिळवणारे खेळाडू, अभिनेते स्वदेशाचे कर टाळण्यासाठी पैसा परदेशी नेतात. असा पैसा जगातील काही करमुक्त प्रदेशात, बेनामी जातो.

जगात असे काही 'कर-मुक्त ' प्रदेश आहेत. ते राजकीय-भौगोलिकदृष्ट्या एखाद्या देशात असले तरी कर-आकारणीसाठी स्वायत्त असतात. त्यावर केंद्र सरकारचे नियंत्रण हेतू-पुरस्सर नसते कारण त्या प्रदेशातून प्रचंड पैसा निर्माण होतो. उदा. ब्रिटनच्या अखत्यारीतील ब्रिटीश वर्जिनिया, केमन, आयल ऑफ मॅन, वगैरे. येथे असणाऱ्या बँका खातेदाराला 'पैसा कोठून आला' हे विचारत नाहीत. त्यांचा मतलब फक्त पैशाशी, उगमाशी नाही. एरवी आपल्यासारख्या सामान्य माणसाला खाते उघडण्याबाबत अतोनात दक्ष (!) असणाऱ्या बँका या मंडळींना प्रत्यक्ष कधीही न पहाता सगळी मदत करतात. मुळात खाते उघडले जाते ते बेनामी. खरा पैसा असतो 'अ'चा. खातेदार असतो 'ब'. 'ब' फक्त कागदोपत्री 'अ' चे नाव येवू नये म्हणून असतो. 'ब' हा 'अ' चा विश्वासू नातलग, मित्र असेल किंवा खाते जेथे आहे तेथील सामान्य रहिवाशी असेल किंवा काल्पनिक व्यक्तीही असेल. हा बेनामांचा पुरवठा 'सल्लागार कंपनी' करते.

अशी एक कंपनी पनामा देशात आहे. तिचे नावही एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत कोणाला माहिती नव्हते. आता निदान विकसित देशांमध्ये ती सर्वतोमुखी आहे. Mossak-fonseca ही ती कंपनी. तिची सुमारे सव्वा कोटी अति-गुप्त कागदपत्रे जर्मनीतील एका प्रतिष्ठित वर्तमानपत्राने हस्तगत केली. ती अर्थातच या कंपनीतील कोणीतरी पुरवली. त्या इसमाचे नाव अजून माहीत नाही. पण या आधीच्या अशा प्रकरणातील विकीलीक्स व स्नोदेन यांनी प्रसृत केलेल्या माहितीपेक्षा ही माहिती कित्येक पटीनी जास्त आहे व जास्त परिणामकारक आहे. ही माहिती 'पनामा पेपर्स'. त्या अनुसार दोन लाखांहून अधिक दर्शनी कंपन्या, त्यांची १४ हजारांहून अधिक खाती प्रथमच उघड झाली. गेल्या चाळीस वर्षांपासून काही महिन्यांपूर्वीपर्यंतची माहिती पुढे आली. नावांमध्ये १४० राजकारणी, त्यात १२ आजी किंवा माजी राष्ट्र-प्रमुख आहेत. काही प्रमुख देश - चीन, रशिया, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, अझरबैजान, सीरिया, आईसलंड, इराण, द. आफ्रिका वगैरे. शिवाय जागतिक फुटबॉल संघटना, काही नामांकित खेळाडू, अभिनेतेही आहेत. यादीत ३० संस्था किंवा व्यक्ती अशा आहेत ज्यांच्याशी आंतरराष्ट्रीय व्यवहार करू नयेत असे निर्बंध होते - उदा. सीरियाच्या हुकूमशहाचा एक नातलग.

गेल्या वर्षीच्या 'आंदोलन' मध्ये (मार्च २०१४) अशा गैरव्यवहारात गुंतलेल्या अनेक जागतिक बँकांचा आढावा घेतला होता. त्याचा उत्तरार्ध (किंवा खरेतर पूर्वार्ध!) आता समोर येत आहे. बँका पैसे स्वत: तर निर्माण करत नाहीत. त्या त्यांच्याकडे येणारा पैसा फक्त हाताळतात.

म्हणजे देशाला लुबाडून म्हणा किंवा उद्योगात फसवणूक करून म्हणा प्रथम पैसा जमवला जातो. सत्ताधीश असे अब्जावधी रुपये अगदी थोड्या अवधीत व वर्षानुवर्षे जमवत आलेले आहेत. हा पैसा बाहेर नेण्यासाठी या लोकांना 'मदत' व 'मार्ग-दर्शन ' करण्यासाठी बँका जशा तत्पर असतात, तशाच 'सल्लागार' कंपन्या. देशोदेशीच्या कायद्यांमध्ये कशा पळवाटा काढता येतील, बेनामी खाती उघडून फक्त दर्शनी कंपन्या कशा स्थापन करता येतील, परदेशी पैसा कसा ठेवता येईल, तो प्रसंगी परत स्वदेशी वैधपणे 'पांढरा' पैसा म्हणून कसा आणता येईल हे त्या दाखवतात. mossak-fonseca चे हे काम. ही खाती अशा बनावट कंपन्यांच्या नावे जगातील कर-मुक्त प्रदेशात उघडली जातात.

जर्मन वृत्तपत्राने ही माहिती मिळाल्यावर आंतरराष्ट्रीय संशोधक-पत्रकारांच्या संघटनेकडे दिली. यात ७६ देशांचे ४०० पत्रकार आहेत. त्यांनी ही हिमालयाएवढी माहिती तपासली. मग ब्रिटनमधील गार्डियन, आपल्याकडील इंडियन एक्स्प्रेस वगैरे

पत्रांनी ती प्रसिद्ध करायला सुरुवात करताच बऱ्याच देशांमध्ये मोठीच खळबळ माजली. कारण उच्च-पदस्थांचे लागेबांधे प्रसिद्ध झाले.

उदाहरणार्थ, रशियातील एका वादकाचे नाव या यादीत आहे. त्याची कायदेशीर मिळकत फारतर काही लाखात जाईल. पण त्याच्या खात्यावर अब्जावधी डॉलर्सची उलाढाल दिसते. हे पैसे 'कर-मुक्त' प्रदेशात आले, मग परत रशियात गेले. त्याचा सरळ संबंध रशियन राष्ट्राध्यक्ष पुतीनपर्यंत पोचतो कारण हा वादक पुतीनचा दीर्घ काळापासून वैयक्तिक घट्ट मित्र आहे.

चीनमधील अनेक उच्चपदस्थांचीही नावे बाहेर आली. त्यात सध्याच्या अध्यक्षाचा मेव्हणा, आधीचा एक वरिष्ठ अधिकारी (त्याचे खाते त्यावेळी अमेरिकेत असलेल्या नातीच्या नावाचे आहे!), वगैरे. चीन मधील खातेदारांशी संबधित ४०,००० खाती आहेत. ही एका देशाच्या नागरिकांची सर्वात जास्त खाती. चिनी अति-श्रीमंतांची अशी खाती प्रामुख्याने ब्रिटीश वर्जिनियात आहेत.

आईसलंडच्या पंतप्रधानाच्या पत्नीचे नाव बाहेर आले; ब्रिटनच्या पंतप्रधानाच्या वडिलांनी तेथे गुंतवणूक केली होती, ते पैसे वारसाहक्काने विद्यमान पंतप्रधानाला मिळाल्याने तोही अडकला; पाकिस्तानच्या पंतप्रधानाच्या मुलांच्या मालकीची लंडन मधील महागडे घरे जाहीर झाली, वगैरे. त्या मानाने यात अजून तरी व्यावसायिक भारतीय राजकारणी दिसत नाहीत.

निरनिराळ्या देशांची या प्रकरणावरची प्रतिक्रिया तिथल्या राजवटीचे रूप दाखवते.

चीनने या बातम्यांवरच (इंटरनेटसकट) प्रसिद्धीला बंदी घातली जेणेकरून ही माहिती जनतेपर्यंत पोचूच नये. रशियाने तेच केले. वर रशियाच्या पुतीनने हा अमेरिकेचा रशियाविरुद्धचा कट आहे असे म्हटले! आणि माहिती खरी असली तरी भ्रष्टाचार नाही असे जाहीर केले. ब्रिटनमध्ये पंतप्रधानाने राजीनामा द्यावा अशी मागणी झाली आणि लोकांनी मोर्चेही काढले. वस्तुत: चीन, रशियाच्या पैशाच्या मानाने ब्रिटनच्या पंतप्रधानाचे प्रकरण अगदीच मामुली रकमेचे (३०-४० लाख रुपये), तेही वारसा हक्काचे. त्यात त्याची चूक तांत्रिक किंवा गहाळपणा एवढीच. पण गहजब झाला कारण राजवट खुली आहे.

आईसलंडच्या पंतप्रधानाला अशाच लोकक्षोभामुळे राजीनामा द्यावा लागला. स्पेनच्या एका मंत्र्याचीही गच्छंती झाली. तेथे चौकशी आयोग नेमला गेला.

इराणचे माजी अध्यक्ष अहमेदिनिजाद हे गरीबांचे कैवारी म्हणून मिरवत असत. एका तेलाच्या संशयास्पद कंपनीत ते गुंतले होते. पण इराणमध्ये ही बातमी प्रामुख्याने इराणमधील बी बी सी ने दिली, म्हणजे ती उच्चभ्रू वर्गापुरती मर्यादित राहिली.

पनामा देशाने कंपनीवर धाड टाकली व संगणक ताब्यात घेतले. पनामाने याबाबत आंतरराष्ट्रीय सहकार्य देण्याचेही मान्य केले.

फ्रान्सने पनामा देशालाच 'काळ्या यादी'त टाकले .

विशेष म्हणजे यात अमेरिकन नागरिकाचे नाव नाही.

२००९ साली जगातील वीस मोठ्या अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांनी एकत्र येऊन अशा व्यवहारांवर कडक नजर ठेवण्यासाठी व त्यांना आळा घालण्यासाठी एकमेकांना सहकार्य देणे, अशा 'कर-मुक्त' प्रदेशांवर त्या त्या देशाचे निर्बंध घालणे, इत्यादी धोरण मान्य केले. या सहमतीपासून पनामा अलिप्त राहिला. अमेरिका या वीस देशात असली तरी पनामाच्याच मालिकेत. अमेरिकेत पैसा ठेवणे हाही ठेवीदाराच्या दृष्टीने पनामामध्ये पैसा ठेवण्यासारखाच सुरक्षित मार्ग आहे. एखाद्या देशाच्या नागरिकाचे अमेरिकेत किती पैसे आहेत याची माहिती त्या देशाला काही कारणास्तव हवी असेल तर ती मिळणे प्राय: अशक्य असते.

या व्यवहारात आक्षेपार्ह काय? 'कर-मुक्त' प्रदेशात खाते उघडण्यावर बहुतेक देशात बंदी नाही. म्हणजे, यातील बहुतेक लोकांनी ना त्यांच्या देशाचा कायदा मोडला, न mossak-fonseca ने. मग प्रश्न कायदा आणि नैतिकता यावर येतो. असा व्यवहार अनैतिक अशासाठी की तो 'सर्व नागरिक समान' हे तत्त्व नाकारतो, जो पैसा शाळा, इस्पितळे, रस्ते या सार्वजनिक कामांसाठी, म्हणजे देशाच्या विकासासाठी वापरला गेला असता, तो पैसा असा भ्रष्टाचार त्या कामासाठी नाकारतो.

अति-श्रीमंतांसासाठी देशाचा कायदा लागू होत नाही. हे पुन्हा एकदा उघड झाले. त्याच बरोबर, या माहितीचा परिणाम काय होणार, हा जिव्हाळ्याचा प्रश्न. वर म्हटल्याप्रमाणे चीन, रशियाने तर हात झटकले आहेतच. सिरीया, झिम्बाब्वे सारख्या हुकूमशाहींकडून कारवाईची अपेक्षाही ठेवता येत नाहे.

आणि जर ही माहिती उघडकीला आलीच नसती, तर ही लुबाडणूक किती काळ पर्यंत चालू राहिली असती? आता निदान युरोप, ऑस्ट्रेलिया, भारत परत काहीतरी प्रयत्न करताना दिसतात. जागतिक बँक आणि आंतर-राष्ट्रीय नाणेनिधी यांनी हा जगाच्या विकासातील अडथळा आहे हे मान्य केले व त्यावर देशांचे नियंत्रण हवे असे बजावले.

तरी हेही नमूद केले पाहिजे की mossak-fonseca ही कंपनी जगातल्या अशा व्यवहारातील फक्त ५ ते १० टक्के व्यवहार हाताळते. म्हणजे हे हिमनागाचे फक्त टोक आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*